CNR NO.MHLA090034422022

## निशाणी क्र. १ खालील आदेश

१. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

## अर्जदाराचे कथन थोडक्यात असे की:

२. अर्जदार क्र.१ चे व २ ते ६ चे वडील नामे **मौलासाब पि.इस्माईलसाब कासार** हे **दि.१०/११/२०२०** रोजी नळगीर, ता.उदगीर, जि.लातूर येथे मृत्यू पावले आहेत. अर्जदार हे सदर मयत **मौलासाब पि.इस्माईलसाब कासार** यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता शासकीय व निमशासकीय कामासाठी आहे. त्यामुळे अर्जदारांनी सदरचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केला आहे.

३. अर्जदारांनी त्याच्या अर्जातील कथनांच्या पुष्ठ्यार्थ अर्जदार क्र.१ सरतपासणीचे शपथपत्र नि.क्र.१० कडे, **मौलासाब पि.इस्माईलसाब कासार** यांचा मृत्यू दाखला नि.क्र.४/१ व वारसाचे प्रमाणपत्र नि.क्र.४/२ कडे दाखल करण्यात आले आहे. तसेच अर्जदारांनी दैनिक यशवंत या वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहिर नोटीस नि.क्र.९ कडे हजर केली आहे.

४. दैनिक यशवंत वर्तमानपत्रामध्ये सदर कामाबाबत जाहिर नोटीस देवूनही आज अखेर कोणीही अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणपत्र देण्याबाबत कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदाराने शपथेवर अर्जदार हेच मयत **मौलासाब पि.इस्माईलसाब कासार** यांचे कायदेशीर वारस असल्याचे सांगितलेले आहेत. अर्जातील कथने, वंशावळ व दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, **मौलासाब पि.इस्माईलसाब**

**कासार** हे दि.१०/११/२०२० रोजी मयत झालेले असून त्यांना अर्जदारांव्यतिरिक्त कोणीही वारस नाहीत. त्यांना अर्जदार हेच सरळ कायदेशीर वारस असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

५. सबब, अर्जदार हे मागणी प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. **अर्जदार क्र.१ ते ६** हे मयत **मौलासाब पि.इस्माईलसाब कासार** यांचे कायदेशीर व सरळ वारस आहेत असा वारसा दाखला अर्जदाराला योग्य न्यायालयीन शुल्क भरुन घेवून देण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JYOTIMALA CHANDRASHEKHAR GUPTA
Date: 2023.01.23 17:21:09 +0530

(श्रीमती जे.सी गुप्ता)

दि. २३/०१/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,उदगीर.